पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

# प्रेस नोट

दिनांक :- ०१/०७/२०२४

## नविन कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम, पोलीस मुख्यालय, वाशिम येथे संपन्न

मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांचे संकल्पनेतुन आज दि. ०१.०७.२०२४ रोजी नविन पोलीस मुख्यालय, वाशिम येथे वाशिम पोलीस दलातर्फे भारतातील प्रमुख तिन फौजदारी कायदे १. भारतीय न्याय संहीता २. भारतीय नागरीक सुरक्षा संहीता ३. भारतीय साक्ष अधिनियम या मध्ये झालेल्या बदलाचे संबंधाने व झालेले बदल आज दि.०१.०७.२०२४ पासुन लागु होत असल्याने नविन पोलीस मुख्यालय, वाशिम येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे, प्रमुख उपस्थिती ॲडव्होकेट प्रशांत दाभाडे, प्राचार्य रामकृष्ण राठी विधी महाविद्यालय, वाशिम, श्रीमती अलका मकासरे, महिला व बाल कल्याण समिती अध्यक्ष, अपर पोलीस अधिक्षक श्री भारत तांगडे, उप विभागीय पोलीस अधिकारी, श्री सुनिलकुमार पुजारी, सहायक सरकारी अभियोक्ता श्री.मानकर, न्यायालय मंगरुळपीर इ. प्रामुख्याने उपस्थित होते. भारतातील प्रमुख तिन फौजदारी कायद्यामध्ये झालेल्या बदलाच्या संबंधाने जनजागृती व्हावी या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाकरीता बाकलीवाल विद्यालय, विद्याभारती विद्यालय आणी हॅपी फेसेस विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थीनी उपस्थित होते. तसेच यावेळी नविन कायद्याच्या अंमलबजावणी बाबत जनतेत जागृती व्हावी विशेषत: महिलांमध्ये नविन कायद्याची जागुरकता व्हावी याकरीता कायद्यातील ठळक माहीती पत्रकांचे विद्यार्थ्यांनमध्ये वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता श्री.रामकृष्ण महल्ले, प्रभारी स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम, श्री.प्रदीप परदेशी, प्र.पोलीस उप अधिक्षक (गृह), श्री.सुनिल अंबुलकर, पोलीस कल्याण शाखा, वाशिम, श्री. अमर चौरे, जिल्हा वाहतुक शाखा, वाशिम, श्री.पवार, राखीव पोलीस निरीक्षक, तसेच सहा.पो.नि. श्रीमती मनिषा तायडे, सहा.पोनि. श्रीमती विणा भालतिलक, पोउपनि.श्रीमती स्वाती इथापे यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. कार्यक्रमाचे संचलन पोउपनि.श्री.राहुल चौधरी यांनी केले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम